Indian Streams Research Journal
Volume I, Issue. XII,Jane, 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# अनुसूचित जाती - जमातीतील इ .7 वी वर्गामध्ये शिकणा-या अनियमित मुली व दुपारनंतर शाळेत न येणा-या समस्याग्रस्त मुलींच्या अडचणींचा शोध

विवेक गं . इनामदार

***प्रस्तावना :—***

माणसाच्या अन्न वस्त्र निवारा व शिक्षण हया तीन मूलभूत गरजा आहेत . भारतीय कलम **45** अन्वये शिक्षण हे सक्तीचे व मोफत केलेले आहे . परंतू सद्यः स्थितीमध्ये खेडयातील पालकांना अजूनही शिक्षणाचे महत्व कळलेले नाही . विद्यार्थ्यांचे निरीक्षण केले असता असे दिसून आले की अनुसूचित जाती जमातीतील लोकांची आर्थिक स्थिती कमकूवत होती . ते आपल्या पाल्यांना रोजी रोटीसाठी कामाला घेऊन जातात . त्यामुळे त्या मुलींची शाळा बूडते . काही पालक लहान मूलांना सांभाळण्यासाठी ही मुलींना घरीच ठेवतात . तसेच बरेचसे पालक कामधंदा निमित्त परप्रांतात जातात सोबत ते आपल्या मुलाबाळांना घेऊन जातात आणि त्यामुळे त्यांच्या शिक्षणाचा प्रवाह काही काळ तसाच थांबतो . काही पालक अज्ञान असल्यामुळे मुलींना शाळेत न पाठवता घरीच त्यांना काम करण्यास ठेवतात . त्यामुळे तेथील मुलींना शाळेविषयी आत्मियता राहत नाही आणि बालवयातच त्यांचे लग्न केले जाते .

परंतू आजकालचे पालक हे जागृत झालेले आहेत . त्यामुळे ते आपल्या मुलींना शाळेत पाठवत आहेत . शासनातर्फे पुरविल्या जाणा-या सुविधांचा ते लाभ घेत आहेत . त्यांच्या मुलांसाठी गणवेश ,फी, माफ करून शिष्यवृत्ती इ . सवलती आहत . हया सवलतीमुळे ते आपल्या मुलांना शाळेत पाठवत आहेत .

काही गावात मात्र अनुसूचित जाती जमातीतील मुलींना शाळेत येताना अनेक अडचणी येतात . त्या अडचणींचा शोध घेण्यासाठी संशोधनाची आवश्यकता आहे .

संशोधनाची गरज :-

**6** ते **14** वयोगटातील सर्व मुली अनेक सामाजिक आर्थिक व कौटुंबिक कारणामुळे शाळेमध्ये अनुपस्थित राहतात . त्यांच्या अनुपस्थितीची कारणे शोधण्यासाठी या संशोधनाची गरज आहे त्याच बरोबर पुढील कारणांचा शोध घेण्यासाठी संशोधनाची गरज आहे .

**1** . अनुसूचित जाती जमातीतील मुलीच्या पालकांची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली राहत नाही .
**2** . त्या मुलींना घरची कामे करावी लागतात व लहान भावंडाचा सांभाळ करावा लागतो .
**3** . स्त्री शिक्षण देणे म्हणजे धर्म नियमाविरूध्द आचरण आहे हे कितपत सत्य आहे हयाचा शोध घेण्यासाठी संशोधनाची उपयुक्तता वाटते .
**4** . काही शाळामध्ये स्त्री शिक्षकांचा अभाव आहे किंवा लांब अंतरावर शाळा आहेत यामुळे शाळेत मुली येत नसतील का ? याचा शोध घेण्यासाठी या संशोधनाची गरज आहे .

संशोधनाचे महत्व :-

शंकरराव चव्हाण हायस्कुल असर्जन येथील अनुसूचित जाती जमातीतील इ . **7** वी वर्गामध्ये शिकणा-या मुली शाळेत नियमित येत नाहीत आणि आल्यावर त्या दुपारनंतर शाळेत परत येत नाहीत . म्हणून अशा समस्याग्रस्त मुलींच्या व तिच्या अडचणींचा शोध घ्यावा त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात यासाठी संशोधन महत्वाचे आहे .

सदरील मुलींना व तिच्या पालकांना महत्व पटवुन देणे गरजेचे वाटले . स्त्री व पुरूष हे कुटूंबाचे दोन चाके आहेत . त्यामुळे दोन्ही चाके मजबूत असावी अशा मुलींना शिक्षणाच्या निरनिराळया संधी उपलब्ध करून द्याव्यात त्यांना शालेय प्रवाहात आणावे त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून द्यावे . पालकांना मुलींच्या शिक्षणाचे फायदे काय हे समजून द्यावे यासाठी या संशोधनाची निवड केली .

**Please cite this Article as :**विवेक गं . इनामदार **,**अनुसूचित जाती - जमातीतील इ .7 वी वर्गामध्ये शिकणा-या ............: **Indian Streams Research Journal (Jane ; 2012)**

संशोधनाची उद्दिष्टे :-

1 . अनुसूचित जाती जमातीतील  मुलींना शिक्षण घेताना येणा-या अडचणींचा शोध घेणे .
2 . मुलीच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय योजना सुचविणे .
3 . मुलींना मिळणा-या शासकीय सुविधांची माहिती करून देणे .

कार्यात्मक व्याख्या

1 . नांदेड शहर :-
मराठवाडा या विभागातील नांदेड हे जिल्हयाचे ऐतिहासिक ठिकाण होय .

2 . अडचणी :-
शिक्षण घेताना येणा-या समस्या म्हणजे अडचणी .

3 . अनुपस्थिती :-
शाळेत सतत गैरहजर राहणे .

संशोधनाची गृहितके :-

1 . अनुसूचित जाती जमातीतील मुली शिक्षणापासून वंचित आहेत .
2 . अनुसूचित जाती  जमातीतील मुलींना शिक्षण घेण्यासाठी समस्या येतात .

संशोधन परिकल्पना :-

1 . मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना नोकरीच्या जागा संबंधी अधिक माहिती देता येतील .
2 . पालकांचे उद्‌बोधन करता येईल .
3 . मुलींच्या समस्या सोडविण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न केल्यास शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होईल .

संशोधनाची व्याप्ती :-

1 . क्षेत्रव्याप्ती :-
प्रस्तुत संशोधन हे शंकरराव चव्हाण हायस्कुल असर्जन शाळेशी संबंधीत आहे .

2 . नमुना व्याप्ती :-
हे संशोधन केवळ इ . 7 वी च्या विद्यार्थ्यांशी संबंधीत आहे .

3 . कालखंड व्याप्ती :-
प्रस्तुत संशोधन शैक्षणिक कार्य 2012 या कालावधीत व्यापलेलआहे .

संशोधनाच्या मर्यादा :-

1 . क्षेत्र मर्यादा :-
प्रस्तुत संशोधन शंकरराव चव्हाण हायस्कुल असर्जन या शाळेपुरतेच मर्यादीत आहे .

2 . नमुना मर्यादा :-
प्रस्तुत संशोधनासाठी शंकरराव चव्हाण हायस्कुल असर्जन या शाळेतील इ . 7 वी हा वर्ग निवडला आहे .

3 . विद्यार्थी संख्या मर्यादा :-
इ . 7 वी वर्गामधील संशोधकाने 20 मुलींची निवड केली आहे .

प्रस्तुत संशोधनाची पध्दती :-

प्रस्तुत संशोधन हे उपयोजित प्रकारचे आहे . संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे .

संशोधनाची साधने व तंत्रे :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा वापर करून  प्रश्नावलीचा वापर संशोधनाचे साधन म्हणून  विद्याथ्यासाठी केला गेला आहे .

प्रस्तुत संशोधनातील नमुना निवड :-

प्रस्तुत संशोधनात शंकरराव चव्हाण हास्कुल असर्जन शाळा निवडली आहे . या नमुना निवड पध्दतीत संशोधनासाठी जे प्रतिसादक सहजा सहजी उपलब्ध होऊ शकतात अशाचाच समावेश नमुना निवडित करण्यात आला आहे . प्रस्तुत संशोधनात शंकरराव चव्हाण हायस्कुल असर्जन येथील इयत्ता 7 वीतील 20 विद्यार्थ्यांची यादृच्छिक पध्दतीने संशोधनासाठी नमुना निवड केली .

संख्याशास्त्रीय परिमाण :-

प्रस्तुत कृतिसंशोधनासाठी संशोधकाने शेकडेवारी या संख्याशास्त्रीय परिमाणाचा वापर केला आहे .

निष्कर्ष :-

1 . मागासवर्गीय मुलींचे शाळेत येण्याचे प्रमाण 60 टक्के आहे .
2 . पालकांचे अज्ञान अंधश्रध्दा यामुळे पालक मुलींना शाळेत पाठविण्यात असमर्थ आहे .
3 . लहान वयात लग्न केले जातात त्यामुळे मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते .
4 . अपू-या उत्पन्नामुळे व दारिद्रयामुळे पालक मुलींच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करू शकत नाहीत असे 40 टक्के मुलींनी सांगीतले .

5 . मागासवर्गीय 35 टक्के मुली लहान भावंडाचा सांभाळ करणे इ . कामे करतात .

शिफारशी :-

1 . सकस आहाराची योजना सध्या इ . 1 ली ते 5 वी करता आहेत ती पुढे वाढवून इ . 6 वी ते 7 वी करीता करण्यात यावी .
2 . मागासवर्गीय पालकामध्ये असलेल्या अंधश्रध्दा निर्मुलनाचे कार्यक्रम राबवावेत .
3 . मुख्याध्यापकांनी शाळांना मिळणाया खर्चामधून विद्युत पुरवठा पाणी पुरवठा करावा .
4 . शाळेत पालक मेळावे आयोजित करून शाळेत न पाठविणा-या पालकांना आपल्या मुलींना शाळेत पाठविण्यास प्रयत्न करावे .

ग्रंथसूची :-

1 . मुळे रा . शं . आणि उमाठे वि . तु ., (1998) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे ,(आवृत्ती तिसरी), विद्या प्रकाशन औरंगाबाद .
2 . भितांडे वि . रा : (2004) शैक्षणिक संशोधन पध्दती ,नुतन प्रकाशन ,पुणे .
3 . बापट भा . गो : (1956), शैक्षणिक संशोधन ,(तिसरी आवृत्ती), नुतन प्रकाशन, पुणे .
4 . उपासनी ना . के : कुलकर्णी के . वि . (1987) नवे शैक्षणिक मुल्यमापन आणि संख्याशास्त्र श्री विद्या प्रकाशन ,पुणे .
5 . देशपांडे लीना (1999), सर्वेक्षण एक संशोधन पध्दती ,पुष्प चौथे ,य . च . म . मुक्त विद्यापीठ ,नाशिक .